# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

## अंतर्गत परिपत्रक

सर्व संबंधितांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, विद्यापीठाचे अंतर्गत परिपत्रक क्र.एएन/२५९७, दिनांक १३/०७/२०२६ नुसार पात्र सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना विवक्षित स्वरुपाच्या कामाकरिता सहभागी करुन घेण्यात आले आहे. या विषयी सुलभ संदर्भासाठी खालीलप्रमाणे दिशानिर्देश देण्यात येत आहेत :-

१) संबंधीत विशेष कार्य अधिकारी यांनी, विभागप्रमुखांनी नेमून दिलेल्या कक्षाचे/उपविभागाचे/कार्यासनाचे संपूर्ण कामकाज विभागप्रमुखांनी विहित केलेल्या पध्दतीने त्यांच्या पर्यवेक्षणाखाली पार पाडावे.

२) उपरोक्त कामकाजादरम्यान आवश्यक तेथे "पडताळणी स्वाक्षरी (Counter Signature)" करावी.

३) विभागाच्या बाहेर पाठविला जाणारा पत्रव्यवहार, प्रस्ताव, प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रे मात्र केवळ विभागप्रमुखांच्या स्वाक्षरीने केला जाईल.

४) विभागातील वित्तीय देयकांची पडताळणी 'विशेष कार्य अधिकारी' करु शकतील. मात्र वित्तीय मान्यता / शिफारस विभागप्रमुख यांच्या स्वाक्षरीने करण्यात येईल.

५) उपरोक्त क्र.०१ ते ०४ व्यतिरिक्त, विभागप्रमुखांनी वेळोवेळी दिलेल्या अथवा प्रदान केलेल्या जबाबदाऱ्या 'विशेष कार्य अधिकारी' पार पाडतील. मात्र अंतिम उत्तरदायित्व हे विभागाच्या विभागप्रमुखांचे असेल.

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७
जा.क्र. : एएन/ 3547
दिनांक : 09 SEP 2026

( प्रा.(डॉ.) प्रफुल्ल पवार )
प्रभारी कुलसचिव

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. मा.संचालक, सर्व प्रशाला
३. मा.शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय शाखा

यांना विनंती की, सदर परिपत्रकातील आशय आपल्या विभागातील सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.